■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२२ ■ शनिवार दि.९ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 322 ■ Saturday Dt. 9 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक

महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीत जनावरांची होतेय बेकायदेशीर कत्तल, पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह?

एस पी नवनीत काँवत यांनी याप्रकरणाकडे गांभिर्याने लक्ष घालून दोषींवर कठोर कारवाई करावी

चोरीच्या मार्गाने पाच किलो बीफ मटन विक्री करत असताना!

मुस्लिम गोरक्षकांनी आरोपी पकडला, मात्र पोलिसांकडून कत्तलीचा स्त्रोत अद्याप गूढ?

मास जप्त, आरोपी पकडला, पण जनावरांची कत्तल कोणी केली याचा पोलिसांना पत्ता नाही; फक्त वरवरच्या कारवाईमुळे रॅकेट अजूनही सक्रिय?

नेकनूरचा आरोपी बीडमध्ये बीफ मटन विक्री करत असल्याचा रेकॉर्ड; तपासी अंमलदार व पोलीस ठाण्यावर जनतेचे सवाल?

गोरक्षकांचा सापळा यशस्वी, पण पोलिसांचा तपास फसला; पोलिस तपासाला कोणाचा आशीर्वाद?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रभर जनावरांची खरेदी–विक्री थांबवून बीफबंदी काटेकोरपणे राबविण्याचा निर्णय कुरेशी समाजाने घेतला आहे. जनावरांची कत्तल करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देत, यासाठी विशेष मुस्लिम गोरक्षकांचे पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकांनी अलीकडेच बीड जिल्ह्यातील विविध ठिकाणी धाडसी कारवाया करून जनावरे ताब्यात घेतल्याची आणि बेकायदेशीर कत्तल रोखल्याची चर्चा जोरात आहे. या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश जात असून, गोसंवर्धनाबाबत जनजागृतीसही हातभार लागणार आहे. अशीच एक घटना नेकनूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत २७ जुलै रोजी बेकायदेशीर बीफ विक्रीचा प्रकार उघडकीस आला. स्वतःच्या फायद्यासाठी चोरीच्या मार्गाने पाच किलो बीफ मटन विक्री करत असताना मुस्लिम गोरक्षक पथकाने एका आरोपीला रंगेहात पकडले.

सदर प्रकरणात तात्काळ पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला, मात्र तपासातील महत्वाचा मुद्दा अद्याप अनुत्तरित आहे. हा मास कुठून आणला गेला आणि जनावरांची कत्तल नेमकी कोणी केली हे तपासी अंमलदार निष्पन्न करण्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा मूळ स्रोत शोधण्याची आणि मोठ्या रॅकेटचा उलगडा करण्याची मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. दरम्यान नेकनुरचा आरोपी पूर्वीपासूनच बीड शहरात चोरीच्या मार्गाने मटन विक्री करत असल्याचा रेकॉर्ड असल्याची माहिती समोर येत आहे. तरीदेखील या प्रकरणाचा सखोल तपास करून मासाचा स्रोत, कत्तल करणारे आणि संपूर्ण रॅकेट उघड करणार का? असा सवाल सध्या जनतेतून जोरात उपस्थित होत आहे. तपासाची गती मंद असल्याने आणि महत्वाच्या पुराव्यांकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा असून, तपासी अंमलदारांसह नेकनूर पोलीस ठाण्याच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. स्थानिक नागरिकांकडून या प्रकरणाचा पारदर्शक तपास करण्याची मागणी होत आहे. स्थानिकांच्या मते असे की, आरोपीकडून केवळ विक्रीसाठी आणलेले मास जप्त करून प्रकरण थांबविण्याऐवजी या मांसाचा स्रोत, कत्तल कोठे आणि कोणी केली, याचा सखोल तपास होणे आवश्यक आहे. तथापि, तपासी अंमलदाराने आजपर्यंत या घटनेचा मूळ धागा उलगडलेला नाही. यामुळे संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश होण्याऐवजी फक्त आरोपी अटक एवढ्यावरच कारवाई मर्यादित राहिल्याची टीका होत आहे.

दरम्यान, जनतेतून असा सवाल उपस्थित होत आहे की, जेव्हा आरोपीचा बीड शहरातील मटन विक्रीचा इतिहास आहे, तेव्हा नेकनूर पोलीस ठाणे आणि तपासी अंमलदार हे सर्व पुरावे एकत्र करून मोठ्या प्रमाणातील बेकायदेशीर व्यापार उघड करतील का? की प्रकरणाला फक्त वरवरची चौकशी करून फाईल बंद केली जाईल? या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील गोरक्षण, कायद्याची अंमलबजावणी आणि पोलिसांच्या भूमिकेवर व्यापक चर्चा रंगली आहे. अनेक नागरिकांनी या प्रकाराला आळा बसण्यासाठी पारदर्शक आणि जलदगतीने तपास करण्याची, तसेच अशा रॅकेट्सना मूळापासून उद्ध्वस्त करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

बीड शहरातील समस्या प्रकरणी मुख्याधिकारी यांची घेतली डॉ. योगेश क्षीरसागरांनी भेट

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी (दि.८) नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील रस्ते, अस्वच्छता, वीजपुरवठा, पाणीटंचाई तसेच नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून निवेदन सादर करण्यात आले. यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.

निवेदनात म्हटले की, शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे, बंद पडलेल्या स्ट्रीटलाईट सुरू करणे, नव्या स्ट्रीटलाईट आणि मिनी हायमास्ट बसवणे, चौकाचौकातील लाईट कार्यान्वित करणे, नवीन पोल बसवून एलईडी लाईट बसवणे, पाणी पुरवठा सुरळीत व वेळेवर करणे, पाईपलाईन लिकेज दुरुस्त करणे तसेच अमृत अटल पाणी पुरवठा योजना सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच, स्व. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह (नागोबागल्ली), बौद्धविहार दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली. पंतप्रधान आवास घरकुल योजना आणि रमाई घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते वाटप करणे, शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, अतिक्रमण हटवणे, प्रमुख रस्त्यांना मंजुरी देणे (स्टेडियमजवळील रस्ता, धानोरा रोड, ब्रह्मकुमारी केंद्र ते उर्वी अपार्टमेंट, तहसील ते निरा हॉस्पिटल मार्ग), प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि दलित वस्ती तसेच इतर नागरी वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरविणे यांसारख्या मागण्या निवेदनात नमूद आहेत. शहरातील दैनंदिन जीवनाशी निगडित या सर्व समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शिष्टमंडळाने केली असून, मुख्याधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, माजी नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त मुख्याधिकाऱ्यांचा सत्कार

बीड नगरपरिषदेचे नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे हे नुकतेच रुजू झाले आहेत, त्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, माजी नगरसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

बीडमध्ये जनसुरक्षा विधेयकाविरूद्ध धरणे

बीड । प्रतिनिधी

जनसुरक्षा विधेयक रद्द झालेच पाहिजे या मागणीसाठी आक्रमक झालेल्या सर्व विरोधीपक्षांच्या वतीने आज शनिवार (दि.९) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित आंदोलकांनी भाजप महायुतीच्या सरकारविरूध्द जोरदार घोषणाबाजी केली. सदरील जनसुरक्षा विधेयक नागरीकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या व संविधानातील मुलभूत अधिकारांच्या विरोधी असल्यामुळे ते तात्काळ रद्द करावे अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे प्रदेश सरचिटनीस दादासाहेब मुंडे, कॉ. अजय बुरांडे, मोहन गुंड, संगमेश्वर आंधळकर, गणेश मस्के, डी. जी. तांदळे, घाडगे सर, रोहिदास जाधव, कॉ. ज्योतीराम हरकुडे, आम आदमीचे सादेकभाई आदिंसह अनेकांनी सहभाग घेतला.

गावठी कट्ट्यासह सागर मोरे स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात!

गावठी कट्ट्याचा पुरवठा करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल; या जलद कारवाईचे कौतुक

गेवराई । प्रतिनिधी

बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गावठी कट्टा बाळगणाऱ्या एकाला अटक करून त्याच्याकडून गावठी कट्टा जप्त केली. प्राप्त माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेला गोपनीय माहिती मिळाली होती की एक व्यक्ती अवैध शस्त्रासह फिरत आहे. त्यानुसार पथकाने तत्काळ सापळा रचून आरोपीस ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्याच्याकडून एक गावठी कट्टा जप्त करण्यात

पान २ वर

रक्षाबंधनाच्या दिवशी रक्षकांचा खरा चमत्कार

एसपी नवनीत कॉवत यांच्या प्रयत्नातून हरवलेला मुलगा आठ वर्षांनी आईच्या कुशीत!

नवनाथ आडे । गेवराई

रक्षाबंधन म्हणजे भाऊ–बहिणीच्या प्रेमाचं प्रतीक. पण यंदा बीड जिल्ह्यातील एका मातेच्या आयुष्यात रक्षाबंधनाचा दिवस अविस्मरणीय ठरला, आणि या सर्व क्षणाच्या केंद्रस्थानी होते बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत त्यांच्या नेतृत्वाखालील पोलिसांनी एक आठ वर्षांपूर्वी हरवलेला मुलगा शोधून काढत त्याची पुन्हा आईच्या कुशीत परतफेड केली. ही घटना फक्त पोलिसी तपासाचं यश नसून, माणुसकीचा झराच आहे. आठ वर्षांपूर्वी हरवलेला मुलगा शोधून काढणं हे एखाद्या आईच्या डोळ्यांतील अश्रूंना दिलासा देण्यासारखं आहे, आणि नवनीत कॉवत यांच्या संवेदनशीलतेचं हे जिवंत उदाहरण आहे.

पान २ वर

सामाजिक स्तरावर कौतुकाचा वर्षाव!

या घटनेनंतर बीड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक नवनीत कावात यांच्या कामगिरीचं सर्वत्र कौतुक केलं जात आहे. सोशल मीडियावरून नागरिकांनी आभार व्यक्त केले असून, हीच खरी राखीची भेट असं म्हणत त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यात दिव्यांग ॲट्रॉसिटी कायद्याचे फलक लावण्याची प्रहारची मागणी

दिव्यांग बांधवांसाठी प्रहार मैदानात; ॲट्रॉसिटी कायद्याची ताकद प्रत्येक पोलीस ठाण्यात दिसली पाहिजे?

किल्ले धारूर पोलीस स्टेशनमार्फत एसपींना निवेदन; एसपी नवनीत कॉवत यांनी घ्यावी तातडीने दखल!

गेवराई । प्रतिनिधी

किल्ले धारूर पोलीस स्टेशनमार्फत प्रहार संघटनेने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना निवेदन देऊन दिव्यांग ट्रॉसिटी कायद्याची जनजागृती करण्यासाठी सर्व पोलीस ठाण्यांमध्ये माहितीफलक लावण्याची मागणी केली आहे. दिव्यांग कायदा २०१६ नुसार असलेल्या परिपत्रकानुसार किल्ले धारूर पोलीस स्टेशनमार्फत पोलीस अधीक्षकांना प्रहार संघटनेतर्फे निवेदन देऊन दिव्यांग ट्रॉसिटी कायद्याची माहिती देणारे फलक जिल्हातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये लावण्याची मागणी करण्यात आली. या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दिव्यांगांवरील अत्याचार रोखण्यासाठी तसेच कायद्याबाबत जनजागृती होण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात ठळक ठिकाणी माहितीफलक लावणे आवश्यक आहे.

या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांना आपले हक्क, कायदेशीर संरक्षण आणि तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया स्पष्टपणे कळेल, असे प्रहार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा किल्ले धारूर तालुकाध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी सांगितले. पोलीस प्रशासनाकडून या मागणीवर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. २०१६ सालच्या दिव्यांग हक्क संरक्षण कायद्यानुसार कलम ९२ मध्ये दिव्यांग व्यक्तींवर अत्याचार, अन्याय, आरेवारी करणे किंवा त्यांच्याशी वेगळ्या व अपमानास्पद भाषेत बोलणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या कायद्याच्या तरतुदीनुसार, अशा गुन्ह्यास दोषी आढळलेल्या व्यक्तीस किमान सहा महिन्यांचा साधा कारावास किंवा पाच वर्षांपर्यंत कठोर कारावासाची शिक्षा होऊ शकते. यासोबतच दंडाचीही तरतूद करण्यात आली आहे.

कायद्याचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना सन्मानाने व भेदभावाशिवाय जगण्याचा अधिकार मिळवून देणे हा आहे. सामाजिक भान वाढवण्यासाठी आणि अशा घटना रोखण्यासाठी पोलीस प्रशासन, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. प्रहार पक्षाच्या म्हणण्यानुसार, हे फलक लावल्यास दिव्यांग बांधवांना त्यांच्या हक्कांची जाणीव होईल आणि जनजागृती वाढेल. या मागणीची पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तातडीने दखल घेऊन सर्व पोलीस ठाण्यांत फलक लावण्याचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत 'आपली आष्टी, हरित आष्टी' वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ

आष्टी । प्रतिनिधी

पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने आपली आष्टी, हरित आष्टी या संकल्पनेतून वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ आज आष्टी शहरातील गवारे वस्ती रोड, उपबाजार समिती परिसर आणि घनकचरा व्यवस्थापन केंद्र परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार मा. श्री. सुरेश धस यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी स्वतः झाडे लावून मोहिमेत सहभाग नोंदवला. याप्रसंगी सुरेश धस म्हणाले, प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. या उपक्रमात धनश्री बिगर शेती नागरी पतसंस्था मर्या. आष्टी, श्री गणेश विद्यालय आष्टी, जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी आणि टायगर अकॅडमी आष्टी या संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी त्यांचे विशेष आभार मानले आणि कौतुक केले.

या कार्यक्रमास आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार तथा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे, आष्टी नगराध्यक्ष जिया बेग, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, पाटोदा भाजपा तालुकाध्यक्ष भागवत येवले शिरूर कासार भाजपा तालुका अध्यक्ष सुरेश उगलमुगले उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, नगरसेवक अरुण भैय्या निकाळजे, गटनेते तथा नगरसेवक किशोर झरेकर, नगरसेवक भारत मुरकुटे, नगरसेवक शरीफ शेख, नगरसेवक सुरेश वारंगुळे, नगरसेवक इर्शान खान, नगरसेवक सुनील रेडेकर, नगरसेवक बाळासाहेब घोडके, बाबू कदम, संजय मुळे, शाम वाल्हेकर, इंजि.गहीनाथ शिरसाठ, इंजि.अथहर बेग, लेखपाल साठे यांच्यासह शासकीय अधिकारी-कर्मचारी, पर्यावरणप्रेमी नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजलगावात मुख्यरस्त्यावर साचते गुडघाभर पाणी!

मोहन जगताप यांनी रस्त्यावर उतरत नगरपरिषद कर्मचाऱ्यांची केली कानऊघडणी

आमदार प्रकाश सोळंके च्या निष्काळजी कारभारावर जनतेचा संताप

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावर पडणाऱ्या पावसामुळे नरवडे कॉम्प्लेक्ससमोर गेल्या अनेक दिवसांपासून साचलेल्या गुडघाभर पाण्यामुळे व्यापाऱ्यांचे हाल सुरू असून आहेत. यामुळे नागरिक, वाहन चालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान मोहन जगताप यांनी गुरुवारी दुपारी रस्त्यावर उतरत या प्रश्नासंदर्भात नगरपरिषद कर्मचाऱ्यांची कान उघडनी केली. दरम्यान यावेळी नागरिकांनी लोकप्रतिनिधीच्या निष्काळजीपणा विषयी संताप व्यक्त केला.

पडणाऱ्या पावसामुळे शहरातील बीड रोड नरवडे कॉम्प्लेक्स समोरील परिसर पाण्याने तुडुंब भरल्या जात आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गुडघाभर पाणी जमा होते. नगर परिषद गेल्या पाच ते सहा वर्षां पासून प्रशासकाच्या ताब्यात आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधीचे नियंत्रण नाही. नाल्यांची सफाई नसल्याने पावसाचे पाणी नालीत अनं नाल्याचे पाणी रस्त्यावर साचते आणि शहरातील मुख्य भागात असह्य परिस्थिती निर्माण होते. नगरपरिषद लोकप्रतिनिधींनी आता तरी जागं व्हावं, साचलेल्या पाण्याचा तत्काळ निचरा करून व्यापार आणि नागरिकांचे हाल थांबावेत, यासाठी छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन मोहन जगताप रस्त्यावर उतरले. यावेळी त्यांनी रस्त्याची नाल्याची पाहणी केली. व्यापाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या. संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना बोलावून घेतले. तात्काळ हा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली. यावेळी त्यांच्यासोबत नगरसेवक शरद यादव उपस्थित होते.

बालासाहेब रामभाऊ उघडे यांचा प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम

सिरसाळा । प्रतिनिधी

काल बालासाहेब रामभाऊ उघडे यांचा प्रथम पुण्यस्मरण निमित्त त्यांच्या पश्चाताप मागे पत्नी एक मुलगी जावई व तीन मुले व तीन सुना असा मोठा परिवार आहे. व बुद्ध धम्म यांच्या पद्धतीने बुद्ध वंदना त्रिशरण पंचशील घेऊन प्रथमच पुण्यस्मरण दि.१०. सप्टेंबर रोजी रविवार सकाळी ठीक ११.३० वाजता राहत्या घरी कासारी (बो) येथे प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम ठेवलेला आहे.

मित्रमंडळी व पाहुणे मंडळी व राजकीय क्षेत्रातील मान्यवर यांना उघडे परिवारातर्फे विनंती करण्यात येत आहे की १० सप्टेंबर रोजी आपली उपस्थिती असावी हीच उघडे परिवारची विनंती श्रीमती आरुणा बाळासाहेब उघडे (पत्नी), सौ.पुजा जयवर्धन नाथभजन (मुलगी.), श्री विजय बाळासाहेब उघडे (मुलगा), श्री अजय बाळासाहेब उघडे (मुलगा), श्री संजय बाळासाहेब उघडे (मुलगा), व समस्त उघडे परिवार यांनी केली आहे. भोजन वेळ दुपारी ०१ ते आपल्या आगमना पर्यंत आहे.

पान १ वरून...

रक्षाबंधनाच्या दिवशी रक्षकांचा खरा चमत्कार

सविस्तर माहितीनुसार, बीड जिल्ह्यातील एका महिलेला आठ वर्षांपूर्वी तिचा मुलगा हरवला होता. अनेक प्रयत्न करूनही तो सापडला नाही. वेळोवेळी पाठपुरावा केला, परंतु शोध लागला नव्हता. परंतु पोलीस अधीक्षक पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून नवनीत कॉवत यांनी जुन्या प्रकरणांचा आढावा घेण्यास सुरुवात केली. विशेष पथक तयार करून त्यांनी या केसचा सखोल तपास सुरू केला. तांत्रिक साधनांचा वापर, जुन्या फाइल्सचे पुनरावलोकन, आणि अनेक ठिकाणी तपास करत करत अखेर मुलाचा ठावठिकाणा लागला. जेव्हा आई आणि मुलाची भेट घडवून आणण्यात आली, तेव्हा उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले. एक आई आपल्या पोटच्या गोळ्याला पुन्हा मिठीत घेते, तो क्षण म्हणजे रक्षाबंधनाच्या दिवशी 'रक्षण' या शब्दाला नव्या अर्थानं उजाळा देणारा होता.

गावठी कट्ट्यासह सागर मोरे स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात!

आली. मिळालेल्या माहितीनुसार, पथकाला खबर मिळाली होती की तकिया मशीदजवळ, लेंडी रोडवरील उपविभागीय वन कार्यालयाच्या गेटजवळ एक इसम फिकट निळ्या रंगाचा टी-शर्ट व निळी पँट परिधान करून, कमरेला गावठी कट्टा लावून कोणाची तरी वाट पाहत उभा आहे. या माहितीवर तात्काळ पथक रवाना झाले आणि परिसरात शोधमोहीम राबवून त्या इसमाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गावठी कट्टा जप्त करण्यात आले. सागर उर्फ सनी प्रकाश मोरे (वय २४, रा. खडी क्रशरच्या बाजूला, जुना धानोरा रोड, जिजाऊ नगर, बीड) असे या इसमाचे नाव असून, चौकशीत त्याने सदरील कट्टा वैभव संजय वराट (रा. चक्रधर नगर, बीड) व रितेश प्रभाकर वडमारे (रा. राजुरी वेस, बीड) या दोघांनी दिल्याचे सांगितले.

पोलिसांनी त्याच्याकडून किंमती ४० हजार रुपये असलेले पिस्तूल जप्त केले असून तिन्ही आरोपीविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्रास्त्र कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

।। यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:चा ।। दृष्टांत... राखी पौर्णिमा

हिंदू पंचांगाप्रमाणे श्रावणात येणारी राखी पौर्णिमा ही नारळी पौर्णिमेच्या दिवशी किंवा पौर्णिमा लागोपाठ दोन दिवस असेल तर दुसऱ्या दिवशी असणाऱ्या पौर्णिमेला साजरी करतात. याच दिवसाला'रक्षाबंधन'म्हणतात. रक्षाबंधन हा हिंदू धर्मातील अतिशय लोकप्रिय आहे हिंदू धर्मातील प्रत्येक सनामागे एक सामाजिक विचार असतो. तोच सामाजिक विचार या सनामध्ये दिसतो. पुरोगामी म्हणून घेणारे पुरोगाम्यांनी मनुस्मृती ग्रंथास सोयीप्रमाणे धुर्तनिती अवलबै बदनाम केले आहे.पण याच मनुस्मृती मध्ये असे यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:। यात्रेतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफला: म्हणजे ज्या कुळामध्ये स्त्रीचा बाल सन्मान होऊन सत्कार होतो. तिथे सुशील, गुणी, उत्तम मुलं निपततात. तर जिथे स्त्रियांचा सन्मान होत नाही तिथे कुठलीच प्रगती होत नाही. हा मौलिक विचार लहानपणापासून समाजामध्ये रुजवल्या जावा हा उदात्त दृष्टिकोन आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये दिसतो .जिथे स्त्रियांचा सन्मान केला जातो तिथे ईश्वराचे अस्तित्व असते पण ज्या ठिकाणी स्त्रियांचा सन्मान केला जात नाही तिथे मात्र त्या वंशाचा त्या जागेचा नायनाट होतो. या सणांमध्ये कसल्याही प्रकारच्या भेदभाव न करता घरातील बहिण-भाऊ हा सण साजरा करतात.विधीवत बहिण आपल्या भावास कुंकूम तिलक लावतात, त्यावर अक्षता लावतात. औक्षण करतात आणि राखी बनतात...आणि आपल्या भावासाठी दिर्घायुष्याची याचना ईश्वराकडे करतात. भाऊ बहिणीस रोख रक्कम, साडी, एखादी भेट वस्तू ओवाळणी म्हणून देतो. दोघांपैकि जे छोटे असेल ते मोठ्याचे पाया पडतात.

या विधीस पवित्रा रोपण असे म्हणतात. पावित्र्याचे रोपण करणे होय. औक्षण करताना बहिण भावाचा सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि विशेषतः आरोग्याचा उत्कर्ष व्हावा... आपले रक्षण करावे अशी मंगल कामना करते. या दिवशी घरात मिष्ठान्न केल्या जाते तर काहि कुटुंबात परंपरे प्रमाणे पुरणपोळीच केल्या जाते.हा राखी पौर्णिमाचा सन हमखास गणपतीउत्सवाच्या पुर्वी श्रावणातील पौर्णिमेच्या दिवशीच साजरा करतात.

पुढे सोयीप्रमाणे हरतालिकेपर्यंत हा सन साजरा होतो. माहेश्वरी बांधवात हा रक्षाबंधनाचा सन हरतालिकेच्या दिवशी साजरा करतात. तर एका आदर्श उपक्रमांतर्गत वृक्षांना राखी बांधून त्याचे रक्षण करण्याची स्वागतहार्य प्रथा सुरू झाली आहे. उत्तर भारताच्या ग्रामीण भागामध्ये ज्या महिलांचे बहिर्विवाह पद्धतीने विवाह झाले आहेत. त्यांच्यामध्ये हा सण वेगळ्या पध्दतीने साजरा करण्याची एक वेगळी पद्धत आहे असो. अनेक कारणांमुळे बरेच कुटुंब आता विभक्त झाले आहेत. त्यामुळे या सणाला प्रतिकात्मकतेचे स्वरूप प्राप्त झाले असले तरी सुद्धा हा सण अतिशय लोकप्रिय आहे.राखी पौर्णिमेचे महत्त्व चित्रपट, नाटके, कथा, कादंबऱ्या, कविता आणि लोखगीतातुन व्यक्त होतांना दिसते. ज्या स्त्रीस रक्ताचा सख्खा भाऊ नाही ती स्त्री ओळखीच्या परिचयाच्या भावाला राखी बांधून त्याला मानस बंधू करते. तर पुरुषास रक्ताची सखी बहीण नसेल तर तो इतर स्त्रीकडून राखी बांधून तिला मानस भगिनी करतो.

त्यामुळे सामाजिक ऐक्य वाढण्यासाठी या राखी पौर्णिमा खुप प्रेरक आहे. राखी बांधण्याच्या या पवित्र सणातून स्नेह परस्पर प्रेम वृद्धिंगत करण्याची प्रथा अस्तित्वात आली आहे. विविधतेने नटलेल्या आपल्या भारतात वेगवेगळ्या प्रांतात नोकर आपल्या मालकाला, ब्राह्मण आपल्या यजमानाला, मुलगी आपल्या वडिलांना आणि पत्नी नवऱ्याला सुद्धा राखी बांधते. आपल्यापेक्षा बलवान सामर्थ्यशाली माणसाला राखी बांधून आपल्या आरक्षणाचे वचन घेणे हीच या पाठीमागची मंगल भावना आहे. मराठी आणि हिंदी चित्रपटातून रक्षाबंधनाच्या चित्रीकरणातून केलेले प्रयत्न हे सामाजिक ऐक्य वाढवण्यासाठीच आहे.राखी पौर्णिमा या सनाचा पाया प्रेम, पराक्रम, संयम, साहस आणि मांगल्य हेच आहे .पण म्हणून म्हणून आपल्या पूर्वजांनी या नात्याच्या पवित्रतेचा महिमा गायला आहे. आपल्या भारत देशाने संस्कृतीचे उत्तम उदाहरण देऊन मानवाला योग्य दिशा प्रदान केली आहे म्हणून आमची भारतीय संस्कृती विश्वगुरू आहे. स्त्रींयाचा मानसन्मान हा सुद्धा या सणामधील दिलेला मुख्य उपदेश होय. फक्त एक स्त्री हक्क फक्त स्त्रीस कायद्यांवय हक्क देऊन ,स्त्रीला वरवर सन्मान देणाऱ्या लोकांना या सनाचे महत्व कळाले नाहि. धुर्त लोकांनी राजकीय फायद्यासाठी बहिण भावांच्या नात्यांमध्ये आणलेली कटूता ही अक्षम्य आहे. (आई-वडिलांच्या स्थावर मालमत्तेमध्ये मुलीला वाटा देण्याच्या कायद्यामुळे अनेक बहीण-भावामध्ये कटूता आली आहे. त्यांची भेट आता राखी पौर्णिमेच्या मंगल दिवशी होण्याऐवजी दर महिन्याला कोर्टामध्ये कॅलेंडर तारखेला होते आहे. हे आपले दुर्दैव आहे) प्राचीन काळी सूर्योदय समयी स्नान करत उपास कर्म करून वृध्द व्यक्ती राखी तयार करत. तांदूळ, सोने, पांढऱ्या मोहऱ्या एकत्र करून त्यांची पुरचुंडी बांधल्या जात असे त्यालाच राखी असे म्हणत. त्या पुरचुंडीची विधिवत पूजा करून ती पुरचुंडी भावास बांधत असे. तर काहिच ठिकाणी कापसाच्या सुताच्या नऊ धाग्यांची जुडी एकत्र करून तिला १२ किंवा १८ किंवा २४ गाठी मारल्या जात व त्या ठिकाणी ब्रह्मा, विष्णू, महेश, ओंकार आणि ब्रम्हांड नायक सूर्यदेवासह इत्यादी देव देवतांना आव्हान केले जात असे व ती राखी भावांना बांधल्या जात असे. अशी ही राखी पौर्णिमा भारतीय समाजव्यवस्थेचे ऐक्य टिकून ठेवणाऱ्या कौटुंबिक, धार्मिक, अध्यात्मिक आणि आर्थिक सुबत्ता आणणारा सणसोहळ्या निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा.



निवेदक सुरेश साळुंके
७०२०५५५०६५

नारळी पौर्णिमा म्हणजेच समुद्र पुजनाचा उत्सव

नारळी पौर्णिमा! कोळी बांधवांचा सण. खास करून कोकण, महाराष्ट्र, गोवा आणि दक्षिण भारतातील किनारपट्टी भागांत याचे मोठे महत्त्व आहे. कोळी बांधव समुद्राला नारळ अर्पण करतात आणि सुरळीत मासेमारी होण्यासाठी आशीर्वाद मागतात.

पण समुद्राचे पूजन केवळ कोळी बांधवांनीच का करावे? समुद्र तर सगळ्यांनाच भरभरून देत असतो. म्हणून सगळ्यांनीच त्याच्याप्रती कृतज्ञ असायला हवे. समुद्र म्हणजे निसर्गाने दिलेले एक अद्वितीय वरदान, निसर्गाचा अथांग खजिना. मानवाच्या प्राचीन इतिहासात, आजच्या विज्ञानात आणि भविष्यातील जीवनातही समुद्राचं स्थान अत्यंत महत्त्वाचं आहे. समुद्र हा केवळ एक पाण्याचा स्रोत नाही, तर तो जीवनाचा उगम, हवामानाचा नियंत्रक, आणि जैवविविधतेचा खजिनाही आहे.

समुद्र आपल्याला अनेक प्रकारे मदत करतो. सर्वात आधी, तो आपल्याला अन्न देतो - मासे आणि समुद्री अन्न याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. मच्छीमारी हा लाखो लोकांचा उदरनिर्वाहाचा व्यवसाय आहे. याशिवाय, समुद्रात आढळणाऱ्या खनिजांपासून तेल, नैसर्गिक वायू आणि मीठ यांचा सुद्धा उपसा केला जातो. समुद्र किनाऱ्यावरील बंदरांमुळे आंतरराष्ट्रीय व्यापार शक्य झाला आहे. समुद्रमार्गे प्रवास, वस्तूंची आयात-निर्यात व प्रवासी वाहतूक यामध्ये समुद्राचा मोलाचा वाटा आहे. समुद्रातील पाण्याची उष्णता व थंडी ही हवेच्या तापमानावर परिणाम करते. यामुळेच समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या प्रदेशांचे हवामान तुलनेने समसमान आणि आल्हाददायक असते. समुद्रातील वाफेपासून ढग निर्माण होतात आणि त्यातून पाऊस पडतो. या चक्रामुळे शेतीला पाणी मिळते आणि आपले जलस्रोतही भरतात.

समुद्राच्या सौंदर्यामुळे तो पर्यटनाच्या दृष्टीनेही खूप महत्त्वाचा आहे. गोवा, केरळ, दीव, पोर्ट ब्लेअर, मुंबई यांसारख्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. समुद्रकिनाऱ्यावर विविध खेळ, जलक्रीडा, नौका सफर आणि सूर्यास्त पाहणे या गोष्टी पर्यटकांना खूप आवडतात. समुद्री जीवांपासून विविध औषधे व रसायने तयार होतात. इतकेच काय पण ज्या मीठाशिवाय जेवणाला चव येत नाही, ते मीठ सुध्दा हा समूद्रच देतो की आपल्याला.

या समूद्राचे निळेशार पाणी, मऊ वाळू, संधीप्रकाशात चमकणाऱ्या लाटा हे दृश्य मनाला एक वेगळीच प्रसन्नता देतात. सकाळच्या सूर्यकिरणांनी उजळलेला अथांग निळा समुद्र, संध्याकाळी केशरी आभा असलेले किनारे आणि शांत लाटांचा आवाज मनाला शांती देतो. समुद्र आपल्याला नम्रता, स्थिरता आणि धैर्य शिकवतो. म्हणून मनाने, विचाराने थकलेला माणूस समूद्र किनारी जाऊन बसला की तो एक नीरव शांतता अनूभवतो आणि तिथून एक सकारात्मक ऊर्जा घेऊनच निघतो. म्हणूनच भगवद्गीतेत देखील म्हटले आहे,

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी।।

असं असलं तरी अलीकडच्या काळात समुद्र अनेक संकटांचा सामना करत आहे. मानवी आक्रमकतेमुळे समुद्रातील प्रदूषण वाढत आहे. प्लास्टिक, तेल, रासायनिक पदार्थ आणि सांडपाणी थेट समुद्रात टाकले जात आहे, यामुळे समुद्रातील जीवसृष्टी धोक्यात आली आहे. काही ठिकाणी प्रवाळ बेटं नष्ट होत आहेत, मासे मरत आहेत आणि जैवसाखळी विस्कळीत होत आहे. समुद्राचा शाश्वत उपयोग करायचा असेल, तर त्याचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. प्लास्टिकचा वापर कमी करणे, समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता राखणे, मच्छीमारीवर मर्यादा ठेवणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि जागरूकता वाढवणे हे पावलं आपल्याला उचलावी लागतील. शासन, स्वयंसेवी संस्था, पर्यटक आणि स्थानिक लोक यांना एकत्र येऊन समुद्र वाचवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

समुद्र हा निसर्गाचा एक अद्वितीय आणि अमूल्य ठेवा आहे. तो आपल्या जीवनाचा भाग असून त्याच्याविना जीवन असंभव आहे. समुद्र आपल्याला अन्न, ऊर्जा, सौंदर्य आणि अर्थव्यवस्था या सर्व गोष्टी देतो. म्हणूनच त्याचं रक्षण करणं हे आपलं नैतिक आणि सामाजिक कर्तव्य आहे. भविष्यातील पिढ्यांसाठीही समुद्राचं हे अमूल्य देणं टिकवून ठेवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणं गरजेचं आहे. त्यामुळे आजच्या दिवशी कोळी बांधवांसारखे समूद्रावर त्याचे पूजन करायला गेलो नाही तरी चालेल पण त्याने आपल्याला जे काही भरभरून दिलंय त्याबद्दल कृतज्ञ राहू!

बघा पटतंय का....

संकलन आणि लेखन
श्री बाजीराव नवनाथ ढाकणे
जलदुत, पर्यावरणप्रेमी तथा बीड जिल्हा समन्वयक, महाएनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य ९४२१९८९९०९

रमाई माता यांचा पुतळा उभारण्याच्या मागणीसाठी डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली नगर पालिकेला दिले निवेदन

भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा : अशोक वाघमारे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात नगरपालिकेच्या माध्यमातून भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी अशोक भाऊ वाघमारे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. बीड शहरात बीड नगर पालिकेच्या अनेक महापुरुषांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत. मात्र बौद्ध समाजाच्या माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात आलेला नाही. त्यामुळे भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारण्यात यावा अशा मागणीचे निवेदन अशोक भाऊ वाघमारे यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घडविण्यात माता रमाई यांचा मोठा हात होता. ज्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर विदेशात जाऊन शिक्षण घेत होते त्यावेळी माता रमाई यांनी हाल अपेष्टा झेलून आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला होता. त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण घेता यावी म्हणून कधीच कुटुंबाची अडचण सांगितली नाही त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अनेक वाद्य घेऊन विद्वान झाले. त्यांच्या तल्लख बुद्धीतून राज्यघटना लिहिली गेली. पेठ बीड भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या परिसरात भीमसृष्टी उभारण्यात आलेली आहे. या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या यांच्या जयंती आणि महापरिनिर्वाणदिनी बौद्ध समाज हजारोंच्या संख्येने अभिवादन करायला येत असतो. मात्र माता रमाई माता शहरात कुठेच पुतळा नसल्याने बौद्ध समाजाला आपआपल्या घरीच माता रमाई यांच्या जयंती दिनी अभिवादन करावे लागते. माता रमाई यांचा पुतळा बीड शहरात उभारण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून बौद्ध समाज करत आहे मात्र या मागणीकडे बीड नगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याने बौद्ध समाजातून नाराजगी व्यक्त करण्यात येत आहे. भीमसृष्टीमध्ये माता रमाई यांचा पुतळा उभारला गेल्यास बौद्ध समाज हजारोंच्या संख्येने याठिकाणी उपस्थित राहून अभिवादन करेल. माता रमाई यांचा पुतळा उभारण्यासाठी भीमसृष्टी येथील जागा उपलब्ध असल्याने या ठिकाणी पुतळा उभारण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली दिलेल्या निवेदनातून अशोक भाऊ वाघमारे यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना केली आहे. याप्रसंगी नगरसेवक गणेश वाघमारे, अशोक वीर, रवींद्र कदम, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, बिबीशन लांडगे, इकबाल शेख, सय्यद मुस्तफा, अमोल पवळ, दत्ता जाधव, डॉ.रमेश शिंदे, गोरख मोमीन, दादा कांबळे, सोनवणे आकाश, माजेद कुरेशी, साजिद जहागीरदार, मिलिंद ठोकळ यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

कामगार नेते गौतम आगळे यांनी घेतली मुख्याधिकाऱ्यांची भेट

बीड शहरातील घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नावर केली चर्चा

बीड । प्रतिनिधी

रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे पदाधिकारी कामगार प्रतिनिधी च्या शिष्टमंडळाने शुक्रवारी दिनांक ८ ऑगस्ट रोजी दुपारी ४:३० वा. नवनियुक्त नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची भेट घेतली. शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित विविध समस्यांबाबत सविस्तर चर्चा करून मागिल ०२ वर्षांपासून घनकचरा व्यवस्थापनातील १५० कंत्राटी कामगारांना अयोग्य व बेकायदेशीररित्या कामावरून कमी केल्याने शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सदरील कामगारांना तात्काळ कामावर रुजू करून घ्यावे अन्यथा मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता नगरपरिषद बीड समोर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. यावर तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन नगर परिषद बीड मुख्याधिकारी फडसे यांनी दिले.

निवेदनात म्हटले की शहरात घंटागाडी वेळेवर पाठवून नाल्यातील व रस्त्यावरील कचरा त्वरित उचलणे, चौका चौकातील जी घाण साचली आहे, त्यामुळे बीड शहरातील नागरिकांनवर आरोग्य च्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या तात्काळ दूर करण्यासाठी स्वच्छता मोहीम राबवावी असे नमूद केले आहे. शिष्टमंडळात रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर, मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड, बीड जिल्हा अध्यक्षा अनिता बचुटे, उपाध्यक्षा सुनीता जोगदंड, कामगार प्रतिनिधी बबीता तांगडे, सुनीता जोगदंड राजकुमारी मच्छल, बीना सौदा इत्यादी उपस्थित होते, अशी माहिती संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

कालिकादेवी विद्यालयात वृक्षारोपण संपन्न

शिरूर कासार । प्रतिनिधी

दि.०७ ऑगस्ट २०२५ गुरूवार रोजी आदर्श शिक्षण संस्था, बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.) येथे महाराष्ट्र शासणाच्या आदेशानुसार 'ऑगस्ट २०२५ मध्ये एकाच वेळी महावृक्ष लागवड अभियान' अंतर्गत शिरूर (का.) तालुक्याचे तहसिलदार सुरेश घोळवे, गट शिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे व वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे या मान्यवरांच्या हस्ते कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या परिसरात 'महावृक्ष लागवड अभियान' राबवून प्राचार्य केशव भांगे यांच्या संकल्पनेतून १०१ वृक्षांची लागवड करण्यात आली. 'हरित महाराष्ट्र-समृद्ध महाराष्ट्र' या उपक्रमा अंतर्गत 'हरित बीड' करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुध्दा 'वृक्षारोपण जनजागृती' हा उपक्रम संपूर्ण बीड जिल्ह्यात राबविला. त्याचाच एक भाग म्हणून कालिकादेवी विद्यालयाने विविध प्रकारची झाडे लावून 'महावृक्ष लागवड अभियान' राबवून यशस्वी केले. यावेळी भटक्या विमुक्तांच्या प्रदेशउपाध्यक्षा अॅड.भाग्यश्री ढाकणे (चेमटे), उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय तुपे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, प्रा.महारूद्र डोंगरे, विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे, परीक्षा प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.विनोद गलांडे, प्रा.अनिल जरे, डॉ. सत्यनारायण ढवळे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अमर खोले, प्रा.सौ.सिमा ढवळे, कवयित्री सानिका खेडकर व तहसिल मधील कर्मचारी, गटशिक्षणधिकारी कार्यालयातील कर्मचारी, वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी 'वृक्षारोपण' या राष्ट्रीय उपक्रमाचे साक्षीदार होण्यासाठी 'महावृक्ष लागवड अभियानात सहभाग नोंदवविला.

गोरक्षनाथ प्राथमिक माध्यमिक विद्यालयात मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

सिमा ओस्तवाल यांच पुस्तक वही पेन घेणारे आजचे विद्यार्थी भविष्यातील अधिकारी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथील गोरक्षनाथ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात इ. १ ते १० वी च्या मुलाना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने ऊसतोड कामगार शेतकरी कष्टकरी यांच्या मुलांना एक मदतीचा हात म्हणून मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून सहकार्य करत आलेले हे प्रतिष्ठान आहे.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ.सीमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष गुरु आनंद प्रतिष्ठान बीड), समंदर खान (गटशिक्षणाधिकारी प.स बीड), माजी प्राचार्य तथा मकरध्वज शिक्षण संस्थेचे सचिव सोमनाथराव बडे, सिद्धेश्वर माटे (ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प.स. बीड), नागेश शिंदे (माजी सरपंच ढेकणमोहा), अदनान खान (कार्यकारी संपादक दैनिक किसान बीड) बंडू गाडीवान (सरपंच), अनिल वाघमारे (संपादक डोंगरचा राजा), अंकुश गोरे (मु.अ सरस्वती विद्यालय बीड), साजिद अहमद सिद्दिकी (केंद्रप्रमुख), बालाप्रसाद जाजू (चेअरमन), संतोष जाधव (ग्रामपंचायत सदस्य) आदी मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक डी.एस. मुंडे, घोळवे (उपमुख्याध्यापक), संजय बडे, बोराडे, जाधव सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी प्राध्यापक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड-पवित्र नातं बहिण-भावाचं म्हणजेच रक्षा बंधन बहिण आपल्या भावाला रितेश ओव्हाळ याला राखी बांधून ओवाळताना चिमुकली प्रियांशी उत्तम ओव्हाळ.

श्री गजानन नागरी सहकारी बँक नेकनूर शाखेचा ग्राहक मेळावा उत्साहात

नेकनूर । प्रतिनिधी

श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीड नेकनूर शाखेच्या वतीने आयोजित ग्राहक मेळावा नुकताच अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. बँक व ग्राहक यांच्यातील विश्वासाचे बंध अधिक घट्ट करणारा हा मेळावा, पारदर्शक व सेवा प्रधान बँकिंगच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड. दत्तात्रय डोईफोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अँड. राजेश तांगडे, संचालक अर्जुन बहिरवाळ तसेच स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य सेवानंद कदम, होमकर पांडुरंग, जफर काझी, भटे कल्याण, सानप अर्जुन आदींची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे व्यवस्थापक विलास कुंभेफळकर यांनी केले. बँकेचे शाखा व्यवस्थापक रवींद्र कुलकर्णी व कर्मचारी अमोल डोईफोडे, गणेश अन्नेराव, गणेश पोपळे, राहुल चौधरी, शेळके सोमनाथ यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केले. यावेळी बँकेच्या विविध सेवा व योजनांची माहिती ग्राहकांना देण्यात आली. ठेवी, विविध कर्ज योजना, ठेवीवरील विमा सुरक्षा योजना तसेच नुकतीच सुरू करण्यात आलेली केशर कर्ज योजना याबाबत उपयुक्त माहिती ग्राहकांसमोर मांडण्यात आली. कार्यक्रमात स्थानिक मान्यवर डॉक्टर, व्यापारी, सराफ संघटनेचे पदाधिकारी व व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. डॉ.शिंदे, डॉ. वाणी, डॉ. खोमणे, डॉ. गणेश, डॉ. हाडे, डॉ. सोंडगे यांसह अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी बँकेच्या कार्यपद्धतीचे व सेवाभावाचे मन:पूर्वक कौतुक केले.

प्रमुख पाहुणे संचालक अर्जुन बहिरवाळ यांनी मुकादम व्यवसायातील अडचणी आणि बँकेच्या सहकार्याचे महत्त्व पटवून दिले. अँड.राजेश तांगडे यांनी ग्राहकांचा वाढता विश्वास, बँकेची पारदर्शकता आणि तांत्रिक प्रगतीचा उल्लेख करून बँकेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष अँड. डोईफोडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेच्या यशस्वी वाटचालीत ग्राहक, कर्मचारी, संचालक मंडळ व स्थानिक समुदायाच्या समन्वयाचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगितले. १९९४ मध्ये स्व. केशरबाई ऊर्फ काकूंनी स्थापन केलेली ही बँक, आज ग्रामीण महाराष्ट्रातील आर्थिक परिवर्तनाचे प्रतीक बनली आहे. स्वावलंबी शेतकरी, व्यापारी आणि नागरिक घडवण्याच्या ध्येयाने सुरू झालेल्या या संस्थेने विश्वासार्हतेचा ठसा उमटवत विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेचे नवे पर्व लिहिले आहे ग्राहकाभिमुख सेवा, डिजिटल बँकिंग, एटीएम, मोबाईल सेवा, व्यवसाय, शेती व शिक्षणासाठी सुलभ कर्ज योजन ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी विमा संरक्षण आपल्या बँकेच्या एटीएम, मोबाईल बँकिंग, विमा संरक्षण आणि विविध कर्ज योजनांचा लाभ घ्या. आधुनिक तंत्रज्ञानासोबत बँकेचा सेवाभाव जोडला जाऊन तुमच्या आर्थिक प्रगतीला नवे बळ मिळू शकते.

राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया विभागाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी मेघराज जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या शिफारशीवरून सोशल मीडिया विभागाचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांनी केली.

मुंबईत झालेल्या कार्यक्रमात पक्षाचे सरचिटणीस आ.शिवाजीराव गर्जे, लतीफ तांबोळी, बोरगे यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर बीडमध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते मेघराज जगदाळे यांना गुरुवारी (दि.७) नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे उपस्थित होते. दरम्यान, मेघराज जगदाळे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या सोशल मीडिया माध्यमातून पक्षाची वैचारिक भूमिका आणि अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल मेघराज जगदाळे यांचे जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.

दिव्यांग कल्याण विभाग सचिव पदावर तुकाराम मुंढे यांच्या निवडीने दिव्यांग बांधवामध्ये आनंदी वातावरण : जीलानी शेख

पाटोदा । प्रतिनिधी

दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई सचिव पदावर तुकाराम मुंढे, भाप्रसे, यांची निवड झाल्याने दिव्यांग बांधवात आनंदाचे वातवरण झाले आहे. बऱ्याच दिवसापासुन दिव्यांग बांधवाचे रखडलेले प्रश्न कोणी सोडवत नव्हते त्यामुळे दिव्यांग बांधव फार आडचणीत आला होता बोगस दिव्यांगानी शासनाला फसवुन बोगस नोकऱ्या मिळवील्या आहेत तसेच बोगस दिव्यांग संस्थाचा देखील फार मोठे जाळ निर्माण झालेले आहे त्याला पण आळा बसणे आवश्यक आहे.

सर्वात जास्त बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारक बीड जिल्हायात आहेत. वनफोर योजनेचा लाभ घेत आहेत तसेच बीड जिल्हायात बोगस शिक्षक बदली प्रकरण फार गाजले होते ते दाबले गेले ते पुन्हा ओपन करून त्यांच्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे, दिव्यांग महामंडळाचे कर्ज प्रकरणे प्रलबीत आहेत त्यामध्ये जाचक अटी केल्या आहेत. सातबारा बोजा टाकुन घेणे, नोकरदार जामीनदार, जीएसटी कोटेशन आशा जाचक अटी केल्या आहेत या सर्व अटी कमी करव्यात तसेच संजय गांधी योजना मानधन वाढ व्हावी, दिव्यांगना घरकुल मिळावे, दिव्यांगना अंत्योदय राशन कार्ड मिळावे, ई रीक्षा योजना सरसकट दिव्यांगना देण्यात यावेत ईलेक्ट्रीक स्कुटर मिळावेत व न्याय मिळावा अशी आशा कर्तव्य दक्ष अधिकारी तुकाराम मुंडे साहेब यांच्याकडे दिव्यांग बांधवांच्या आहेता असे प्रसिद्धी पत्रकात दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्र चे अध्यक्ष जीलानी शेख, शेख आलम, अशोक दगडखैर, शेख शेरखाँ, शेख नदीम, संतोषकुमार राख, वैभव देशमुख, ईश्वर आमटे, दत्ता कदम, गणेश नांदे, बजरंग लांढगे, संतोष गुजाळ, सय्यद मतीन यांनी म्हटले आहे.

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे विधी सेवा सहाय्यता केंद्राची स्थापना

बीड । प्रतिनिधी

जिल्हा विधी सेवा बीडच्या वतीने आज दिनांक ०७/०८/२०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.श्री.आनंद एल. यावलकर साहेब, बीड यांच्या मार्गदर्शनुसार आयोजित करण्यात आला जिल्हा सैनिक कार्यालय बीड येथे माजी सैनिकांच्या कुटुंबातील वीर परिवार सहाय्यता योजना-२०२५ मधील निर्देशानुसार लिगल एड क्लिनिकची स्थापना करण्यात आली आहे.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये एस.टी.शिंदे अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, तत्वशिल कांबळे अधिकारमित्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड, स्कॉ.लिडर विद्यासागर कोरडे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड, श्री.तानीजी साळुंके, श्री.संतोश समुद्रे, श्री.तानाजी साळुंखे, श्री.निवृत्ती मिसाळ, श्री.संजय बांगर, श्री.त्रिंबक तिपाले आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना एस.टी.शिंदे यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा विशयी माहिती दिली. त्यामध्ये वीर परिवार सहाय्यता योजना २०२५ मधील निर्देशानुसार समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे त्याचे अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड, समिती सदस्स म्हणुन जिल्हा सैनिक बोर्ड बीड, समिती सदस्य सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड. या योजनेमध्ये संरक्षण कर्मचारी, माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबित कुटुंबातील सदस्यांना मोफत आणि सक्षम कायदेशीर मदत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समिती यांच्या माध्यमातुन कार्यरत होणार आहे.

यावेळी बोलताना तत्वशिल कांबळे म्हणाले की, या वीर परिवार सहाय्यता योजनेच्या माध्यमातुन मालमत्तेशी संबंधित वाद, कौटुंबिक वाद, ग्राहक बाबी, आर्थिक फसवणुकीपासुन संरक्षण, केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी मदत, दिव्यांग व्यक्तीचा हक्क कायदा २०१६ कायद्यातंर्गत दिव्यागत्व प्रमाणपत्र आणि इतर फायदे मिळवण्यासाठी मदत व इतर कायदेशीर मदतीसाठी मोफत विधीज्ञ जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातुन मिळेल. व या योजनेची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी माजी सैनिक व त्यांचे परिवार हे मोठया संख्येने उपस्थित होते.

शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

बीड । प्रतिनिधी

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख यांचा वाढदिवस अनेक सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. विशेष करून काल परमेश्वर सातपुते सर यांच्यावर बीड जिल्ह्यासह बीड शहर व पिंपळनेर सर्कल मधील विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून जणू शुभेच्छाचा वर्षाव सुरू होता. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवजी साहेब ठाकरे यांनी वाटसवद्वारे तर शिवसेनेचे सचिव तथा शिवसेना नेते विनायक राऊत यांनी फोनवरून शुभेच्छा दिल्या तर बीड जिल्ह्याचे लाडके खासदार बजरंग सोनवणे यांनी दिल्लीला आसतानाही फोनवरून शुभेच्छा दिल्या, याचप्रमाणे आमदार माजी आमदार माजी मंत्री, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तसेच अनेक विविध पक्षाचे आजी माजी जिल्हाप्रमुख, जिल्हाअध्यक्ष, सामाजिक संघटनाचे पदाधिकारी विवध पक्षाचे तालुकाध्यक्ष, उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख सर्व पदाधिकारी व असंख्य शिवसैनिक बंधू भगिनी, त्याचप्रमाणे पत्रकार, डॉक्टर, वकील, शिक्षक, सर्व स्नेही मित्र सहकारी युवा, जेष्ठ शेतकरी कष्टकरी यांच्या सह सर्वजण यांनी वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, सोशल मिडीयाच्या माध्यमातून प्रेमरूपी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

समाजासाठी झटणाऱ्या नेतृत्वाचा वाढदिवस केवळ औपचारिक कार्यक्रमांपुरता न ठेवता सामाजिक कार्यांनी साजरा करावा, ही प्रेरणा देणारा एक वेगळाच आदर्श शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त घालून दिला. त्यांचा वाढदिवस यंदा पिंपळनेर सर्कल अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये रक्तदान, शैक्षणिक साहित्य वाटप, सामाजिक उपक्रम आणि जनसंपर्काच्या कार्यक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात आणि सेवाभावी दृष्टिकोनातून साजरा करण्यात आला. या विशेष दिनाचे औचित्य साधून बाभळवाडी येथील श्री जगदंबा पेट्रोलियम परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक जाणीव जोपासली. या शिबिराचे आयोजन स्थानिक त्यांचे सर्व सहकारी व कार्यकर्ते आणि आरोग्य विभागाच्या सहकार्याने यशस्वी पार पडले. सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपळनेर येथील सनराईज इंग्लिश स्कूल, कन्या शाळा, जिल्हा परिषद शाळा, तसेच बाभळवाडी, बेडूकवाडी, लिंबारूई येथील जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सुमारे ६०० हून अधिक विद्यार्थ्यांना वह्या, पेन, कंपास, शालेय दप्तर व अभ्यासासाठी आवश्यक साहित्य वितरित करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून ग्रामस्थ भावूक झाले. शिक्षण हीच खरी ताकद आहे या विचाराला अनुसरून, सातपुते सरांनी या वाटपामागची भावना विद्यार्थ्यांच्या प्रगतीत सहभागी होण्याची असल्याचे सांगितले. दिवसभर शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे सर्व सहकाऱ्यांच्या, हितचिंतकांच्या, ज्येष्ठ युवा तरुण, सर्वांच्या शुभेच्छा व विविध सामाजिक उपक्रम पार पडल्यानंतर सायंकाळी बाभळवाडी, सांडरवण, पिंपळनेर, बेडूकवाडी, नाथापुर या गावांमध्ये सातपुते सरांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावोगाव रांगोळ्या, फुलांची सजावट तसेच फटाक्यांची आतषबाजी करत वातावरण आनंदमय करण्यात आले. स्थानिक तरुण, वृद्ध नागरिक, शाळकरी मुले, सर्वजण या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते. सर्वच गावांमधून सरांना शेकडो नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थिती लावली. या संपूर्ण वाढदिवस सप्ताहाचे नियोजन सातपुते सरांचे निष्ठावान कार्यकर्ते, युवा सहकारी, ग्रामस्थ व स्थानिक शिक्षक वर्ग यांच्या सहकार्याने करण्यात आले. कार्यक्रम कुठेही औपचारिक न ठेवता खऱ्या अर्थाने समाजाभिमुख, लोकसहभागातून घडवलेला उत्सव ठरला. या सर्व ठिकाणी कार्यक्रमास गावातील गावकरी ज्येष्ठ नागरिक व पिंपळनेर सर्कल मधील युवा तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकीकडे स्मशानभूमी अभावी उघड्यावर अंत्यसंस्कार तर दुसरीकडे ८ वर्षांपूर्वी बांधलेल्या स्मशानभूमीत एकही अंत्यविधी नाही

जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार; पैसा जनतेचा फायदा गुत्तेदाराचा; बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील प्रकार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील १३९४ गावांपैकी तब्बल ६५६ गावांमध्ये अजुनही स्मशानभूमीच अस्तित्वात नाही तर काही ठिकाणी बांधलेल्या स्मशानभूमीची अंत्यंत दुरावस्था असुन बांधकाम ढासळलेल्या स्थितीत तर वादळी वाऱ्यासह पावसात पत्रे उडून गेल्याने निवारा नाही त्यामुळे पावसाळ्यात अंत्यविधी करण्यासाठी अडचण निर्माण होते. मृतदेहाची विटंबना होते. काही गावांमध्ये अंत्यविधी रोखल्याने मृतदेह शासकीय कार्यालयासमोर आणुन ठेवल्याच्या घटनांत वाढ होत आहे. दुसरीकडे मात्र जिल्हा प्रशासनाचा अजब कारभार पहावयास मिळत असुन बीड तालुक्यातील महाजनवाडी येथे ८ वर्षापुर्वी ६ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीत अद्याप एकही अंत्यसंस्कार विधी झाला नसल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे वापरात नसलेली स्मशानभूमी जिल्हा प्रशासनाने केवळ गुत्तेदार पोसण्यासाठीच बांधली का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विचारला आहे.

गावापासून अडीच किलोमीटर गायरानात स्मशानभूमी बांधल्याने वापरात नाही : विश्वंभर गिरी (सरपंच महाजनवाडी)

बीड तालुक्यातील महाजनवाडी गावची लोकसंख्या २२०० च्या आसपास असुन पुर्वी गावात चिंचेच्या झाडाखाली असलेल्या स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण होऊन घरे,गायगोठे बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी स्मशानभूमीची जागा शिल्लक नसल्याने तत्कालीन गावपुढा-यांनी गावापासून अडीच किलोमीटर दुर असलेल्या गायरान जमिनीत स्मशानभूमीचे बांधकाम केलेले आहे. बहुतांश शेतकरी आपल्या शेतात अंत्यविधी करतात तर भुमिहीन असणारे गावालगत नदीच्या ओढ्यात अंत्यविधी करतात. अडीच किलोमीटर गावाच्या बाहेर अंत्यविधीसाठी कोणीही याठिकाणी येत नाही. स्मशानभूमीत ठेवण्यात आलेली लोखंडी जाळी सुद्धा नंतर काढुन नेण्यात आली. त्यामुळे हि स्मशानभूमी वापराविना पडुन असल्याचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.

स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमण गंभीर प्रश्न असुन जिल्हा प्रशासन स्मशानभूमीच्या जागा सुरक्षित कराव्यात : डॉ.गणेश ढवळे

स्मशानभूमीच्या जागेवर होणारे अतिक्रमण हा गंभीर प्रश्न आहे.या अतिक्रमणामुळे स्मशानभूमीची जागा ईतर कारणासाठी वापरली जात आहे. त्यामुळे तेथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याच्या मुलभूत हक्कावर गदा येत आहे. स्मशानभूमीच्या जागेवरून समाज आणि स्थानिक प्रशासन मध्ये संघर्ष निर्माण होतो आहे.अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने योग्य ती उपाययोजना करावी आणि जागांचा ताब घेऊन त्या सुरक्षित कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

आ. संदीप क्षीरसागर यांनी दिलेला शब्द पाळावा : युवराज जाधव

नाळवंडी । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाळवंडी या ठिकाणी पाठीमागील दोन वर्षांपूर्वी बीड मतदार संघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी नाळवंडी गावातील भीम नगर व लहुजी नगर ला जोडला जाणाऱ्या नदीवरील त्या जागेची पाहणी करून त्या ठिकाणी काम प्रारंभीत करण्यासाठी नारळ देखील फोडले होते. परंतु नारळ फोडून तब्बल आता दोन वर्ष झालेली आहेत परंतु अद्याप देखील त्या ठिकाणी पूल झालेला नाही. याच परिसरातून नदी ओलांडत शाळेतील विद्यार्थ्यांना, वयोवृद्धांना, तरुणांना जीव मुठीत घेत नदीच्या मोठ्या प्रवाहातून प्रवास करत शाळेसाठी किंवा इतर कामकाजासाठी गावात यावे लागत आहे. या प्रश्नावर सदरील परिसरातील नागरिकांनी वेळोवेळी स्थानिक पुढाऱ्यांकडे व जिल्हाधिकारी यांच्याकडे तसेच आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे पाठपुरावा केलेला आहे परंतु सदरील कामकाजाबद्दल अद्याप देखील आमदार बोलत नसल्याकारणाने आता भीम नगर व लहुजी नगर मधील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळलेली आहे. तरी सदरील पुलाचे काम आमदार संदीप क्षीरसागर यांनी लवकरात लवकर सुरू करून सदरील परिसरातील ग्रामस्थांची हेळसांड थांबवावी अशी विनंती दोन्ही परिसरातील ग्रामस्थान मधून होत आहे.

बीड शहरातील अनाधिकृत बॅनर हटवण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेची मागणी

पालकमंत्री यांना निवेदन; १५ ऑगस्टपर्यंत कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा : सोनवणे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अनाधिकृत बॅनर आणि होर्डिंग्जमुळे होणारे विद्रूपीकरण आणि वाहतूक अडथळ्याच्या समस्येवर तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी ऑल इंडिया पँथर सेनेने केली आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पालकमंत्री अजीत पवार यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

नितीन सोनवणे यांनी सांगितले की, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्यांसह जालना रोड, नगर रोडसारख्या मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बॅनर लावले जातात. यामुळे शहराचे सौंदर्य बिघडत असून, वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. यावर उपाय म्हणून, पुणे आणि संभाजीनगरच्या धर्तीवर बीड नगरपरिषदेने मुख्य मार्गांवरील दुभाजकांवर जाहिरात होर्डिंग्ज उभारावेत, अशी मागणी त्यांनी केली. यामुळे नगरपरिषदेला महसूल मिळेल, अनाधिकृत बॅनर थांबतील आणि होर्डिंग्जची विटंबना टळेल.

तसेच, मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहावरील शासकीय जागेतील होर्डिंग तात्काळ हटवण्याची मागणीही सोनवणे यांनी केली. १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत प्रशासनाने यावर कारवाई न केल्यास ऑल इंडिया पँथर सेना असंख्य कार्यकर्ते पदाधिकार्या समवेत तीव्र आंदोलन करेल, असा इशारा त्यांनी दिला. बीड शहर स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पावले उचलावीत, असे आवाहन नितीन सोनवणे यांनी केले आहे.

पोलीस अधीक्षक साहेब, अर्चना कुटे व कृष्णा आंधळे ला कधी अटक करायचे? : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हरवलेल्या मुलाला सात वर्षानंतर आपण तसेच आपले अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तपास करून आई वडील व मुलाची भेट घडून आणू शकतात तर मग दोन वर्ष खालील फरार आरोपीला आपण का नाही आणू शकत? साहेब ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालीका अर्चना कुटे यांना आपण कधी अटक करणार साहेब त्यांच्यामुळे हजारो घरे उध्वस्त झाली, कुणी आत्महत्या केली, कोणाच्या मुलीचे लग्न मोडले, कोणाच्या मुला मुलीचे शिक्षण थांबले अशा फरार अर्चना कुटे चा आपण कधी शोध लावणार? हा ठेवीदारांना प्रश्न पडलेला आहे.

तसेच मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फरार आरोपी कृष्णा आंधळे त्याचा पण आपण कधी शोध लावणार? ज्या माणसाने घर उध्वस्त केले. देशमुख कुटुंब यांना रोडवर आणले दारोदारी त्यांना प्रशासनाकडे विनंती करावा लागत आहे अशा आरोपींना धरा साहेब तुमच्याकडून जिल्ह्यातील लोकांच्या खूप अपेक्षा आहे. तुम्हीच न्याय देऊ शकतात.

होळमध्ये मागासवर्गीय शेतकऱ्याची जमीन हडपण्याचा डाव; गुंडांना राजकीय वरदहस्त

जमीन बळकावणाऱ्या गुंडांना नमिता मुंदडा, नेताजी शिंदे यांचा वरदहस्त : सरवदे

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील मागासवर्गीय शेतकरी दत्तात्रय सरवदे यांची केज-अंबाजोगाई रोडलगतची जमीन हडपण्याचा डाव गुंड प्रवृत्तीचे लक्ष्मण दिगंबर घुगे, हनुमंत दिगंबर घुगे या व्यक्तींचा आहे. यासंदर्भात सरवदे यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई न झाल्याने येत्या दि.११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी किंवा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर कुटुंबासह आत्महत्या करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी जाहीर केले. जमीन बळकावणाऱ्या गुंडांना आ.नमिता मुंदडा आणि त्यांचे होळ येथील समर्थक नेताजी शिंदे यांचा वरदहस्त असल्याचा गंभीर आरोप शेतकरी दत्तात्रय सरवदे यांनी केला आहे.

सरवदे यांनी माध्यमांसमोर सांगितले की, माझ्या जमिनीला लागून राहणारे लक्ष्मण दिगंबर घुगे आणि हनुमंत दिगंबर घुगे हे दोघे भाऊ २०२१ पासून सातत्याने त्रास देत आहेत. मी अनेकदा युसुफवडगाव पोलिस ठाण्यात, पोलीस निरीक्षक, तसेच उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार केली. दोन वेळा ट्रॉसिटीचा गुन्हाही दाखल केला, परंतु काहीही कारवाई झाली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातही अनेकदा धाव घेतली, मात्र न्याय मिळाला नाही. सरवदे यांनी पुढे सांगितले की, लक्ष्मण व हनुमंत घुगे यांचे चुलते मयत बाळासाहेब घुगे यांच्याकडून मी होळमधील रोडलगतची जमीन खरेदी केली असून सध्या माझ्या ताब्यात ५३ गुंठे जमीन आहे. ती जमीन हडपण्याच्या उद्देशाने घुगे बंधू त्रास देत आहेत. कोणतेही कागदपत्र नसताना ते जमीन आमची असल्याचा दावा करतात. माझ्या खरेदी केलेल्या जमिनीशेजारी अजून २१ गुंठे जमीन शिल्लक आहे, परंतु ती त्यांना नको आहे. मी मागासवर्गीय असल्याने माझी जमीन बळकावण्याचा डाव ते आखत आहेत. होळ येथील गट क्रमांक १४३ मधील १अ मधून १ हेक्टर ७६ आर मधील ५३ गुंठ्याचा हिशोब प्रशासनाने करून दिल्यास मी आजच जमीन सोडायला तयार आहे, असेही त्यांनी सांगितले.

पुढे ते म्हणाले घुगे बंधूंवर अनेक गंभीर गुन्ह्यांचे आरोप आहेत. शेतात पेरणी करताना अनेकदा वाद झाले. माझी शेती त्यांनी वहिती केली आहे. तिन्ही वेळा ११२ नंबरवर कॉल केला, तरी एकाही वेळेस पोलीस आले नाहीत. माझ्या ट्रॉसिटीच्या खटल्यात साक्ष देणाऱ्यांवर बलात्कारासारखे खोटे गुन्हे लावण्याचा प्रयत्न झाला. गत महिन्यात शेतातील वादाच्या वेळी लक्ष्मण घुगे यांची भावजयी दवाखान्यात असूनही तिला घटनास्थळी दाखवून साक्षीदारांना फसवण्याचे काम करण्यात आले. गावात त्यांची दहशत आहे आणि माझ्या बाजूचे साक्षीदार मिळू नयेत यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात, असे सरवदे यांनी सांगितले.

माझा संतोष देशमुख किंवा महादेव मुंडे होऊ देऊ नका; दत्तात्रय सरवदेंची एसपींना विनंती

माझा संतोष देशमुख किंवा महादेव मुंडे यांच्यासारखा खून करू अशी धमकी घुगे बंधू मला देतात. त्यामुळे आता माझ्या बाबतीत असे काही घडू देऊ नये, अशी विनंती दत्तात्रय सरवदे यांनी बीडच्या एसपींना केली आहे. तसेच, त्यांनी स्थानिक आमदारांवरही नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आमच्या मतदारसंघाच्या आमदार मागासवर्गीय असूनही मी तक्रार केल्यावर त्यांनी कधीही पाठिंबा दिला नाही. त्यांनी साधी चौकशी केली नाही. होळमधील त्यांचे समर्थक नेताजी शिंदे यांचा या गुंडांना राजकीय वरदहस्त आहे. त्यामुळे मला सतत छळ सहन करावा लागत आहे. आता या त्रासाला कंटाळून जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची परवानगी घेऊन ११ ऑगस्ट रोजी कुटुंबासमवेत आत्महत्या करणार आहे, असा इशारा सरवदे यांनी दिला.

स्व. सरपंच संतोष अण्णा देशमुख, स्व. महादेव मुंडे यांची निर्गुण हत्या खून झाला आहे. आता केजमध्ये दलित हत्याकांड होणार आहे. मला वाचवा दलित आंबेडकर समाजाचे शेतकरी सरोदे यांनी कलेक्टरकडे कुटुंबासमवेत आत्महत्या करण्याची परवानगी मागितली आहे. केज, अंबाजोगाई मध्ये दलित आंबेडकर समाजावर सातत्याने अन्याय होत आहे मला आणि माझ्या कुटुंबाला धमकवलं जात आहे. ५३ गुंठ्ठे जमीन बळकवण्याचा प्रयत्न गावगुंड करत आहेत दलित समाजाचे आमदार नमिता मुंदडा यांच्याकडे न्याय मागण्यासाठी गेलो निवेदन दिले मात्र त्या एक शब्दही बोलल्या नाहीत.

आचार्य टाकळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचार फेरीला सभासदांचा भरभरून प्रतिसाद

लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना मतदान करावे : आचार्य

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील आचार्य टाकळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचार फेरीला सभासदांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. दरम्यान लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन संजय गांधी निराधार समितीचे सदस्य, चेअरमन सेवा सहकारी सोसायटी आचार्य टाकळी, भाजपचे तालुका ग्रामीण पश्चिमचे चिटणीस तुकाराम आचार्य यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वैद्यनाथ बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत, त्यामुळे आमचे मत केवळ तुम्हालाच आहे. कुणाच्याही भूलथापांना बळी न पडता आम्ही लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांनाच मत देणार आहोत, अशी ग्वाही आज सभासद मतदारांनी दिली. वैद्यनाथ बँक निवडणूकीसाठी राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजताई मुंडे व आ. धनंजय मुंडे, मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या फेरीला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. वैद्यनाथ को - ऑपरेटिव्ह बँकेसाठी रविवार दि. १० ऑगस्ट रोजी मतदान होत आहे. या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे चार उमेदवार अगोदरच बिनविरोध निवडून आले आहेत. यात माजी खा.डॉ. प्रितमताई मुंडे, सौ. माधुरी मेनकुदळे, अनिल तांदळे, प्रा. विनोद जगतकर यांचा समावेश आहे.

१३ जागांसाठी विद्यमान अध्यक्ष विनोद सामत, उपाध्यक्ष रमेशराव कराड, विजयकुमार वाकेकर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, प्रकाश जोशी, डॉ. राजाराम मुंडे, संदीप लाहोटी, प्रवीण देशपांडे, माहेश्वर निर्मळे, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री हे उमेदवार आहेत. आचार्य टाकळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचार फेरीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन संजय गांधी निराधार समितीचे सदस्य, चेअरमन सेवा सहकारी सोसायटी आचार्य टाकळी, भाजपचे तालुका ग्रामीण पश्चिमचे चिटणीस तुकाराम आचार्य यांनी केले आहे.

ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करा

बीड । प्रतिनिधी

शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण करावे तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभागाचे स्थलांतर करावे अशा मागण्या मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवरचे परिपूर्ण नूतनीकरण करणे आवश्यक आहे. गेल्या काही महिन्यात नागरिकांनी पुढे येत स्वतःहून खर्च करत ऐतिहासिक कारंजा टॉवर लगत सिमेंटचे बाकडे लावले, झाडे लावली, विद्युत मोटारी लावल्या, रंगबिरंगी लाइट्स लावल्या, पाण्याचे फवारे सुरू केले, कंपाउंड ला असलेल्या लोखंडी ग्रील ला रंगरंगोटी केली. तरीसुद्धा या ऐतिहासिक वास्तूचे परिपूर्ण नूतनीकरण करण्याकरिता अजूनही आवश्यक असलेली बारा कामे बाकी आहेत. या कामांची यादी मुख्याधिकारी यांना निवेदनातून देण्यात आली आहे. तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून पहिल्या मजल्यावर हलविण्यात यावे. कारण वसुली विभागात विविध कर भरण्यासाठी जाणाऱ्या ज्येष्ठ आणि वयस्कर नागरिकांना खूप त्रास होतो आहे. यामुळे श्वासोच्छ्वास कमी-अधिक प्रमाणात झाल्यास नागरिकांच्या जीवावर बेतू शकते. म्हणून नवनियुक्त मुख्याधिकारी यांनी या दोन्ही बाबींकडे स्वतः जातीने लक्ष देऊन ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नुतनीकरण करण्यासाठी आवश्यक ते कार्य करावे तसेच बीड नगर परिषदेतील वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून पहिल्या मजल्यावर स्थलांतरित करावे अश्या मागण्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत.

गेवराईतील अतिक्रमणधारकांना पीटीआरचे वाटप

सर्व अतिक्रमण धारकांना हक्काचा पिटीआर मिळवून देऊ : आ. विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील अतिक्रमणधारकाचा पीटीआर चा प्रश्न गंभीर होता. अतिक्रमण धारकांना न्याय मिळाला पाहिजे ही सर्वांची भावना होती. शिवछत्र परिवाराने शासन दरबारी पाठपुरावा करून हा प्रश्न सोडवला, हे खरे असले तरी आपण यात श्रेय घेणार नाही. आपल्या सर्वांच्या संघर्षाचे हे फलित आहे. यापुढील काळात उर्वरित अतिक्रमण धारकांनाही हक्काचा अधिकृत पिटीआर उपलब्ध करून देऊ असे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले तर विरोधक सध्या आपण करीत असलेल्या कामाचा अपप्रचार करून राजकारण करत आहेत, पंधरा - वीस वर्षे सत्ता असताना ज्यांना शहरातील प्रश्न सोडविता आले नाहीत त्यांना आता बोलण्याचा अधिकार नाही असा टोलाही त्यांनी विरोधकांना नाव न घेता मारला.

गेवराई नगरपालिकेच्या वतीने संजयनगर येथील अतिक्रमण धारकांना पिटीआर चे वाटप, लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेशाचे वाटप आणि नगर परिषदेच्या व्हॉट्सप चॅटबॉट सेवेचा शुभारंभ आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवशारदा मल्टिस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, सभापती मुजीब पठाण, माजी नगरसेवक महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, शेख खाजा भाई, दीपक आतकरे, एस. अन्सारी, राधेशाम येवले, शांतीलाल पिसाळ, रिपाइंचे किशोर कांडेकर, कडुदास कांबळे, भास्कर काकडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विरोधकांनी नगरपरिषदेचा स्वार्थासाठी वापर केला त्यांच्या काळात अतिक्रमण धारकाचा प्रश्न प्रलंबित ठेवला, अनुकंपाधारकांना नियुक्ती पत्र देण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. प्रत्येक वेळी राजकारण करण्याचा प्रयत्न केला. अतिक्रमीत जागेवर गाळे काढून भाडे खाण्याचे पाप केले आहे. जनतेने मोठ्या विश्वासाने मला विधानसभेत पाठवले. निवडणूक संपली आणि शिवछत्र परिवार जनतेने दिलेल्या आशिर्वादाची उतराई होण्यासाठी कामाला लागला. नगरपालिकेच्या माध्यमातून सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. नागरिकांचे प्रश्न सोडविले. अनुकंपाधारकांना नियुक्ती, संजय नगर सह सर्व अतिक्रमणधारकांना हक्काचा पीटीआर वाटप यांसह नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियोजन केले. विरोधक मात्र त्याचेही श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत.

पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवछत्र परिवाराने सर्वांना न्याय देण्याचे काम करत आहे. कुणाबरोबरही शिवछत्र परिवाराने दुजा भाव केला नाही आणि करणारही नाही. अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शहरातील नागरिकांचे प्रश्न समजावून सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधक मात्र आमची कॉपी करत आहेत, येणाऱ्या नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये नगरपालिकेला लागलेले हे हुक काढण्याची वेळ आली आहे. शिवछत्र परिवाराची काम करण्याची पद्धत आपण सर्वांनी समजून घेतली पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपण काम करत आहोत. जुने नवे कार्यकर्ते यांनी समन्वय राखून एक दिलाने काम करावे. लोक स्वीकारला तयार आहेत, शिवछत्र परिवाराची ताकद तुमच्या पाठीशी आहे, सरकार आपले आहे कसलीही अडचण येणार नाही सगळ्यांना न्याय देण्याच्या बाबतीमध्ये शिवछत्र परिवार कधीही मागे राहणार नाही असे सांगून परिषदेमध्ये मदत कक्ष सुरू करण्यात आला असून त्याचा नागरिकांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी प्रकाश नरनाळे, सुमनबाई धनवटे, कचराबाई हातागळे, रमेश नन्नवरे, सलमान सय्यद, राजेंद्र सोळुंके, बप्पा आबू उपळकर, खय्युम गुलाब रसूल कुरेशी, शेख अफसर हुसेनी, जनाबाई कांबळे, सायरा कालू पठाण यांना प्रातिनिधिक स्वरूपात पिटीआरचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी प्रास्ताविक केले. कडुदास कांबळे, एस. आर. अन्सारी, महेश दाभाडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला गेवराई शहरातील नागरिकासह संजयनगर आणि परिसरातील अतिक्रमण धारक, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT